ePaper

## सुप्रिया सुळे म्हणाल्या, 'माझ्याविरोधात कोणी तरी लढलेच पाहिजे!'



| वर्ष - 7 | अंक - 151 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 8 ऑक्टोंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- रिझवानने मैदानावर अदा केली नमाज!
- आताच सुधरा नाहीतर...!
- इस्रायलने केली युद्धाची घोषणा!
- पोलिसांवर दगडफेकीचा प्लॅन टोपेंचा!


# उद्योगमंत्र्यांना आश्वासनांचा विसर!

## » उद्योजकांना 2017 पासून जीएसटी वसूलीच्या नोटिस

### » बैठकीत तोडगा काढण्याकडे उद्योग मंत्र्यांचे दुर्लक्ष

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी |

**पिंपरी-चिंचवड शहरातील उद्योजकांना 2017 पासून आलेल्या एमआयडीसीकडून पाठविलेल्या जीएसटी नोटिसवर बैठक घेऊन तोडगा काढण्याच्या आश्वासनाचा उद्योगमंत्री उदय सामंत यांना विसर पडला आहे. चार महिने लोटूनही अद्याप बैठक झाली नाही. तर दुसरीकडे एमआयडीसी कार्यालयाकडून नोटिसचा फतवा काढला जात आहे. या विरोधात लघु उद्योजक संताप व्यक्त करत असून राजकीय उदासिनतेमुळे कोट्यवधी रुपयांचा तोटा पिंपरी-चिंचवड शहरातील लघु उद्योजकांना बसणार आहे.**

एमआयडीसी कार्यालयाला उशिरा शहाणपण सुचले आहे. 2017 पासून अद्यापपर्यंत जीएसटी ची रक्कम भरण्याचा फतवा उद्योजकांना एमआयडीसीकडून काढण्यात आला आहे. त्याला विरोध करत शहरातील उद्योजकांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांची मुंबई येथे भेट घेतली. या वेळी आपल्या मागण्यांचे गाऱ्हाणे मांडले. यावर राज्यभरातील सर्व उद्योजकांच्या संघटनांची बैठक बोलावू, असे आश्वासन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले होते. त्यामध्ये या प्रश्नावर तोडगा काढू, असे सांगितले होते. जुलै महिन्यात उद्योजकांना मंत्र्यांनी आश्वासन दिले होते. मात्र अद्याप बैठकीचे आयोजन केले नाही.



दुसरीकडे 2017 पासून अद्यापपर्यंत जीएसटीची रक्कम भरण्याची अजब नोटिस उद्योजकांना एमआयडीसीकडून पाठविण्यात येत आहे. दरवर्षी ही रक्कम घेणे अपेक्षित असताना एमआयडीसीकडून त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. सध्या पाच वर्षे उशिर केल्याबद्दल दंडासह रक्कम देण्याबाबत दिलेल्या नोटिसमुळे उद्योजक संतप्त भावना व्यक्त करत आहेत. एमआयडीसीकडून उद्योजकांना पाणीपुरवठा, प्लॅन पास, एसनओसी, प्लॉट ट्रॉन्स्फर आदींसह विविध बिले देताना जीएसटीसह बिल देणे अपेक्षित होते. मात्र त्या वेळी एमआयडीसीकडून ही बिले देण्यात आली नाही. उद्योजकांनी नियमीतपणे येणारी बिल भरली होती. मात्र आता 2017 पासून जीएसटीचे बिल देण्याबाबत एमआयडीसीकडून नोटिस पाठविण्यात आल्या आहेत. तसेच पाच वर्षे उशिर केल्यामुळे दंडासह ही रक्कम भरावी, असे नोटिसमध्ये नमूद करण्यात आले आहे. सुरुवातीला पाणीपुरवठ्याच्या बिलामध्ये जीएसटी रक्कमेचा समावेश करून बिले पाठवली होती. एमआयडीसीच्या या मनमानी कारभाराला उद्योजकांनी विरोध केला. त्यानंतर स्वतंत्र नोटिस पाठवायला एमआयडीसीकडून सुरूवात झाली आहे.

### परतावा मिळेना -

जीएसटीचे बिल दिल्यानंतर एक महिन्याच्या आत त्याचा परतावा मिळतो. मात्र आता पाच वर्षे झाल्याने परताव्याच्या रक्कमेपासून उद्योजकांना मुकावे लागणार आहे. एमआयडीसीच्या चुकीमुळे जीएसटी परतावा मिळणार नाही, त्यामध्ये पाच वर्षांपुर्वीची रक्कम, तसेच दंडाची रक्कम आम्ही का भरायची, असा संतप्त सवाल उद्योजक उपस्थित करत आहेत. त्यामुळे ही रक्कम भरायला अद्याप तरी उद्योजकांनी नकारघंटाच दिली आहे.

### राजकीय उदासिनतेचा उद्योगांना फटका

» खंडित वीज पुरवठा, चोरीच्या वाढत्या घटना, नैसर्गिक आपत्ती आदीसह विविध गोष्टींनी पिंपरी-चिंचवड शहरातील उद्योजक त्रस्त आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिका तसेच एमआयडीसी कार्यालय सुविधा देण्याबाबत एकमेकांवर चालढकल करत आहे. राजकीय लोकप्रतिनिधी देखील उद्योजकांच्या समस्यांना केराची टोपली दाखवत आहे. राजकीय उदासिनतेमुळे शहरातील उद्योग बाहेर जाण्याला प्राधान्य देत आहेत. हे रोखण्यासाठी लोकप्रतिनिधींनी उद्योजकांचे प्रश्न प्राधान्याने सोडविणे गरजेचे आहे.

# चक्रपाणी वसाहतीतील रस्त्याला अखेर 'गती'

## » 30 वर्षे प्रलंबित रस्त्याचे काम पूर्ण : आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार

| पिंपरी | महाईन्यूज |

**भोसरी-चक्रपाणी वसाहत येथील गेल्या ३० वर्षांपासून प्रलंबित रस्त्याचे काम अखेर मार्गी लागले असून, सुमारे १ लाख रहिवाशांना दिलासा मिळाला आहे. दिघी-आळंदी मुख्य रस्त्याला जोडणाऱ्या या रस्त्यामुळे वाहनचालक आणि नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.**



आमदार महेश लांडगे यांनी ३४५ मीटर लांब आणि ८ मीटर रुंद असलेल्या रस्त्यावर नियमितपणे सुमारे ५० हजार नागरिक- वाहनचालकांची रहदारी असते. त्यामुळे या रस्त्याचे काम मार्गी लावावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी भाजपा आमदार महेश लांडगे यांना केली होती.

दरम्यान, आमदार महेश लांडगे यांच्या 'आमदार विशेष निधी' योजनेतून या रस्त्याचे काम हाती घेण्यात आले. दिघी-आळंदी मुख्य रस्त्याला हा चक्रपाणी वसाहतीमधील समांतर रस्ता आहे. या रस्त्यामुळे दिघी-आळंदी रस्त्यावरील वाहतुकीचा ताण कमी होणार असून, स्थानिक नागरिकांना दिलासा मिळणार आहे. तसेच, भविष्यातील वाढत्या.लोकसंख्येचा विचार करुन ड्रेनेज व्यवस्थेचे कामही पूर्ण करण्यात आले आहे. आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून परिसरातील प्रलंबित समस्या मार्गी लागत आहेत. कोणतेही काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी पुढाकार घेतला जातो, अशा प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांमधून येत आहेत.

> **"प्रभाग क्रमांक ६ चक्रपाणी वसाहत म्हणजे रेड झोन आणि प्राधिकरणाच्या हद्दीलगत असलेला प्रभाग आहे. त्यामुळे पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यासाठी अनेक अडचणी येतात. गेल्या ३० वर्षांपासून हिच परिस्थिती होती. मात्र, २०१४ पासून आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून परिसरातील पायाभूत सोयी-सुविधा विकसित करण्यावर भर दिला जात आहे.**
>
> **- राजेंद्र लांडगे, माजी नगरसेवक.**

# नॅक प्रक्रियेत सुधारणा करणे गरजेचे!

## चंद्रकांत पाटील यांची केंद्रीय शिक्षण मंत्र्यांना विनंती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अधिकाधिक उच्च शैक्षणिक संस्थांनी राष्ट्रीय मूल्यांकन व प्रमाणन परिषदेकडून (नॅक) मुल्यांकन करून घ्यावे यासाठी या प्रक्रीयेत काही सुधारणा करण्यात याव्या अशी विनंती राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केंद्रीय शिक्षण, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पत्राद्वारे केली आहे.**

केंद्रीय मंत्री प्रधान यांचे पुणे येथील कार्यक्रमांसाठी आगमन झाल्यावर त्यांचे स्वागत करून मंत्री पाटील यांनी त्यांना या संदर्भातील पत्र दिले. देशातील मोठ्या संख्येने उच्च शिक्षण संस्थांसाठी ही प्रक्रिया सोपी आणि परवडणारी बनवण्यासाठी काही सूचना मंत्री पाटील यांनी पत्राद्वारे केल्या आहे. त्यानुसार उच्च शिक्षण संस्था या बिगर-व्यावसायिक आणि विना-अनुदान/स्वयं-वित्तीय तत्त्वावर कार्यरत असायला हव्यात. एकूण विद्यार्थी संख्या 500 पेक्षा कमी,10 हजार पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामीण भागातील संस्था असणे, एकच अभ्यासक्रम असणारे महाविद्यालय, अधिसूचित आदिवासी जिल्ह्यात असावे किंवा फक्त पदवी अभ्यासक्रम चालविणारे महाविद्यालय यापैकी कोणतेही दोन निकष



देखील पूर्ण केले पाहिजेत.अशा महाविद्यालयांसाठी कोणतेही श्रेणी नसावी तर केवळ प्रमाणन झालेले किंवा प्रमाणन न झालेले असाच उल्लेख असावा.

मूल्यांकन शुल्क कमी केले जावे आणि एकूण खर्चाची मर्यादा १ लाख ५० हजार रुपये असावी. मुल्यांकन समितीचे सदस्यांची संख्या राज्याच्या लगतच्या विद्यापीठ क्षेत्रातून फक्त २ असतील. सुमारे ३० टक्के मेट्रिक्स वैकल्पिक केले जाऊ शकतील आणि त्यासाठीचे वेटेज योग्यरित्या पुनर्विनियोजित केले जाऊ शकेल. पीअर टीमचे सदस्य भेटीच्या वेळी क्वालिटेटीव्ह मेट्रिक्स (क्यूआयएम)ची पडताळणी करू शकत असल्याने मेट्रिक संबंधी प्राचार्यांच्या मेट्रिक संबंधी प्रतिज्ञापत्राशिवाय कोणतीही माहिती सादर (अपलोड) करणे

### प्रक्रिया सोपी बनवण्यासाठी सूचना

» केंद्रीय मंत्री प्रधान यांचे पुणे येथील कार्यक्रमांसाठी आगमन झाल्यावर त्यांचे स्वागत करून मंत्री पाटील यांनी त्यांना या संदर्भातील पत्र दिले. देशातील मोठ्या संख्येने उच्च शिक्षण संस्थांसाठी ही प्रक्रिया सोपी आणि परवडणारी बनवण्यासाठी काही सूचना मंत्री पाटील यांनी पत्राद्वारे केल्या आहे. त्यानुसार उच्च शिक्षण संस्था या बिगर-व्यावसायिक आणि विना-अनुदान/स्वयं-वित्तीय तत्त्वावर कार्यरत असायला हव्यात. एकूण विद्यार्थी संख्या 500 पेक्षा कमी, 10 हजार पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामीण भागातील संस्था असणे, एकच अभ्यासक्रम असणारे महाविद्यालय, अधिसूचित आदिवासी जिल्ह्यात असावे किंवा फक्त पदवी अभ्यासक्रम चालविणारे महाविद्यालय यापैकी कोणतेही दोन निकष देखील पूर्ण केले पाहिजेत.

आवश्यक नसावे. नॅकद्वारे मेट्रिक-निहाय सूचना/वेटेजचे पुनर्विनियोजन करण्याची व्यवस्था असावी. उच्च शिक्षण संस्थांच्या मूल्यांकनाची प्रक्रिया सोपी आणि परवडणारी केल्यास अधिकाधिक संस्थांकडून मूल्यांकन करून घेण्यास गती मिळेल. तसेच प्रक्रियेतील गैरप्रकार टाळता येण्यास मदत होईल. प्रक्रियेला गती देण्याचा अनुषंगाने आवश्यक असल्यास आर्थिक प्रोत्साहन/ शुल्क प्रतिपूर्ती योजनाही केंद्र आणि संबंधित राज्य सरकारांद्वारे सामायिकरण आधारावर प्रस्तावित केली जाऊ शकते, असेही मंत्री पाटील यांनी पत्रात नमूद केले आहे.

# न्यायाल्याचे कामकाज ऑनलाईन व्हावे!

## चंद्रचूड पुरोगामी विचारांचे : ॲड असीम सरोदे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**न्यायाल्याचे कामकाज ऑनलाईन स्वरूपात व्हावे यासाठी भारताचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड एकटेच पुरोगामी विचारांचे आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा न्यायव्यस्थेत वापर करावा या मताचे आहेत की काय? त्यांनी मांडलेल्या मतांना आणि आदेशांना इतर उच्च न्यायालयांच्या संथ प्रतिसाद का असतो? असे प्रश्न न्याययंत्रणा सतत मागास ठेवणाऱ्या प्रवृतींच्या न्यायव्यस्थेतील काही लोकांकडे बघून पडतो असे मत ॲड.असीम सरोदे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.**

त्यांच्यासह लॉ लॅब इनोव्हेशन इंडियाचे सदस्य तसेच ॲड.श्रीया आवले, ॲड.बाळकृष्ण निढाळकर, ॲड.रमेश तारू उपस्थित होते.मुंबई उच्च न्यायालयासह महाराष्ट्रातील सगळ्या न्यायालयांचे कामकाज ऑनलाइन पद्धतीने व हायब्रीड




### न्यायालय ही नागरिकांच्या मालकीची

» मुंबई उच्च न्यायालयासह महाराष्ट्रातील सगळ्या न्यायालयांचे कामकाज ऑनलाइन पद्धतीने व हायब्रीड मोडद्वारे सुरू करा या मागणीसाठी 'लॉ लॅब इंडिया' व पक्षकार संघटनेची जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयात तीन महिने पासून पेंडीग आहे व त्याबाबत कोणतीही सुनावणी होत नाही हे दुर्दैवी आहे. न्यायालय ही व्यवस्था न्याय मागणाऱ्या पक्षकारांच्या व सामान्य नागरिकांच्या मालकीची आहे.

मोडद्वारे सुरू करा या मागणीसाठी 'लॉ लॅब इंडिया' व पक्षकार संघटनेची जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयात तीन महिने पासून पेंडीग आहे व त्याबाबत कोणतीही सुनावणी होत नाही हे दुर्दैवी आहे. न्यायालय ही व्यवस्था न्याय मागणाऱ्या पक्षकारांच्या व सामान्य नागरिकांच्या मालकीची आहे त्यामुळे ऑनलाइन तसेच हायब्रीड पद्धतीने कामकाज केल्याने त्यांचा सहभाग वाढेल, न्यायालयीन कामकाजाचा खर्च कमी होईल व पारदर्शकता वाढेल असे जनहित याचिकेत नमूद केले असल्याचे ॲड असीम सरोदे म्हणाले. मुंबई उच्च न्यायालयाचे रजिस्ट्रार, सुप्रीम कोर्टाची ई-कोर्ट कमिटी व राष्ट्रीय सूचना केंद्र यांना जनहित याचिकेत प्रतिवादी करण्यात आलेले आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयात ही जनहित याचिका दाखल करण्यात आली परंतु त्यावेळी सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्याचे आदेश दिले आणि आता मात्र त्यांनीच भारतातील सर्व उच्च न्यायालयांना दोन आठवड्यात ऑनलाइन तसेच हायब्रीड मोड पद्धतीने कामकाज सुरू करण्याचे आदेश दिले हे अनाकलनीय आहे. दुसरीकडे महाराष्ट्रातील कोणत्याच बार असोसिएशनद्वारे अशा प्रश्नांवर कृतीशीलता दाखविण्यात येत नाही.खरे तर ऑनलाइन व हायब्रीड मोड पद्धतीने उच्च न्यायालयांचे कामकाज चालावे ही मागणी सगळ्यांनी उच्च न्यायालयाच्या मुख्य निबंधकांकडे करावी यासाठी आम्ही महाराष्ट्रातील 38 जिल्हा बार असोसिएशनला पत्र पाठविले आहेत.

# विधानसभेसाठी ठाकरे गटाची तयारी!

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

आगामी विधानसभा आणि महापालिका निवडणुकीत ठाकरे गटाचे जास्तीत जास्त आमदार आणि नगरसेवक निवडून आणण्यासाठी चार माजी नगरसेवकांवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या चारही माजी नगरसेवकांकडे प्रत्येकी दोन दोन विधानसभा मतदारसंघ देण्यात आले आहेत. संपूर्ण शहर पिंजून काढत पक्ष संघटन मजबूत करण्याचा निर्धार नगरसेवकांनी व्यक्त केला आहे.

राज्यातील बदलत्या सत्तासमीकरणात शहरातील ताकत वाढविण्याचे आव्हान ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांपुढे आहे. शिवसेनेतील फुटीनंतर अपवादवगळता शहरातील पदाधिकारी फारसे फुटले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. मात्र, आगामी विधानसभा आणि महापालिका निवडणुकांच्या दृष्टीने संघटनात्मक बांधणीवर ठाकरे गटाने लक्ष केंद्रित केले आहे. त्यासाठी चार माजी नगरसेवकांना विशेष जबाबदारी सोपविण्यात आली आहे. माजी गटनेते पृथ्वीराज सुतार यांच्याकडे कोथरूड आणि शिवाजीनगर या मतदारसंघाची जबाबदारी देण्यात आली आहे. बाळासाहेब ओसवाल यांच्याकडे पर्वती आणि खडकवासला, विशाल धनवडे यांच्याकडे कसबा आणि पुणे कॅन्टोन्मेंट आणि संजय भोसले यांच्याकडे वडगाव शेरी आणि हडपसर विधानसभा मतदारसंघ सोपविण्यात आले आहे. हे चारही माजी नगरसेवक या मतदारसंघात निवडणूक समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत.पक्ष संघटना मजबूत करणे, विविध कार्यक्रम घेणे, मतदारसंघाच्या माध्यमातून शहर पिंजून काढण्याची सूचना त्यांना करण्यात आली आहे. दरम्यान, या नव्या जबाबदारीतून पक्ष संघटना वाढविण्यात येईल, असा विश्वास या सर्व नगरसेवकांकडून व्यक्त करण्यात आला आहे.

# पवना बंदिस्त जलवाहिनी सात कोटीचा भुर्दंड!

## जलवाहिनी प्रकल्पाचे काम बंद; पाइप ठेवण्याच्या भाड्यापोटी ठेकेदाराची खिसाभरणी

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाच्या कामास गेल्या १२ वर्षांपासून स्थगिती होती. प्रकल्पासाठीचे लोखंडी पाइप व यंत्रसामग्री मावळ तालुक्यातील खासगी जागेत ठेवण्यात आले असून, त्यासाठी सुरक्षारक्षक नेमले आहेत. मागील साडेचार वर्षांतील पाइप ठेवण्याचे भाडे आणि सुरक्षारक्षकांसाठी सात कोटी ६८ लाख २४ हजार ५९७ खर्च जुन्या ठेकेदाराला दिला जाणार आहे.**



### 31 डिसेंबर 2023 पर्यंत मुदतवाढ

**शासनाने नुकतीच प्रकल्पावरील स्थगिती उठविली आहे. आतापर्यंत केवळ १२.६२ टक्के काम झाले आहे. या कामास ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.**

पवना धरण ते निगडीतील पेठ क्रमांक २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत बंदिस्त जलवाहिनीद्वारे पाणी आणण्याचा प्रकल्प महापालिकेने २००८ मध्ये हाती घेतला होता. ठेकेदाराला ३० एप्रिल २००८ रोजी कार्यारंभ आदेश दिला होता. कामाची मुदत दोन वर्षे म्हणजे २९ एप्रिल २०१० पर्यंत होती. काम सुरू असताना जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर प्रकल्पाच्या विरोधात झालेल्या रास्ता रोको आंदोलनात पोलीस गोळीबारात तीन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. तेव्हापासून काम बंद आहे.

---

# कचरा सेवाशुल्काच्या वसुलीला स्थगितीचा केवळ दिखावा!

## राज्य सरकारकडून आदेश होईना

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेने पूर्वलक्षी प्रभावाने सुरू केलेल्या कचरा सेवाशुल्क वसुलीच्या स्थगितीचा आदेश सव्वादोन महिने उलटून गेला, तरी राज्य सरकारकडून आलेला नाही. त्यामुळे वसुली सुरूच असून, आतापर्यंत तीन लाख ५६ हजार १२७ मालमत्ताधारकांनी सुमारे ४४ कोटी ७० लाख ९० हजार रुपये शुल्काचा भरणा केला आहे. या वसुलीला गृहनिर्माण सोसायट्यांचा तीव्र विरोध आहे.**





राज्य सरकारच्या १ जुलै २०१९ रोजीच्या निर्णयानुसार, महापालिकांसाठी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) स्वच्छता व आरोग्य उपविधी कचरा सेवाशुल्क (उपयोगकर्ता) निर्धारित केले. त्यानुसार पिंपरी महापालिका सभेने २० ऑक्टोबर २०२१ रोजीच्या ठरावानुसार शुल्क वसूल करण्यास मान्यता दिली आहे.

१ एप्रिल २०२३ पासून वर्गीकृत कचरा सेवाशुल्क हे कर आकारणीच्या देयकांमधून वसुलीचा निर्णय घेतला. शहरात सहा लाख सात हजार मालमत्ता आहेत. घरटी दरमहा ६० रुपये व व्यावसायिक आस्थापना असलेल्या मालमत्तांना आकारमानानुसार शुल्क आकारण्यात येत आहे.

शहरात २०१९ पासून २०२३ पर्यंत चार वर्षांचे कचरा शुल्क आकारण्यात येणार आहे. त्यानुसार २०१९-२०२० आणि २०२३-२४ या दोन वर्षांचे शुल्क वसूल करण्यास सुरुवात केली मात्र, चार वर्षांचे शुल्क आकारण्यास शहरातील सोसायटीधारकांनी विरोध केला. त्यावर पावसाळी अधिवेशनात आमदार महेश लांडगे यांनी विचारलेल्या लक्षवेधीवर शुल्क वसुलीला स्थगित देण्याची घोषणा सरकारने केली होती, मात्र, अद्याप महापालिकेला शुल्क वसुलीला स्थगिती दिल्याचा आदेश मिळालेला नाही. त्यामुळे महापालिकेकडून कचरा सेवाशुल्काची वसुली सुरूच आहे.

> “ कचरा सेवा शुल्कासंदर्भात राज्य सरकारचा अद्याप स्थगिती आदेश आला नाही. त्यामुळे शुल्क वसूल करण्यात येत आहे. स्थगिती आदेश आल्यानंतर ज्या नागरिकांनी रक्कम भरली आहे, त्यांच्या रकमेचे समायोजन करण्यात येईल.
>
> **- यशवंत डांगे, सहायक आयुक्त, आरोग्य विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका**

---





# रेल्वे रुळावर दगड ठेवल्या प्रकरणी चिंचवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

। पिंपरी चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुणे-मुंबई लोहमार्गावर चिंचवड ते आकुर्डी रेल्वे स्थानक (Chinchwad) दरम्यान रुळावर मोठमोठे दगड ठेवल्याची घटना शुक्रवारी (दि.6) सायंकाळी उघडकीस आली. वेळेत दगड हटवल्याने मोठी दुर्घटना टळली. आता याप्रकरणी चिंचवड पोलीस ठाण्यात अज्ञाता विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शैलेंद्र अवधेश त्रिपाठी यांनी चिंचवड पोलीस ठाण्यात याप्रकरणी फिर्याद दिली आहे. यावरून अज्ञात इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीत दिलेल्या माहितीनुसार, रेल्वे कर्मचारी ट्रॅकमॅन इर्शाद शेख, अनिरुद्ध शिंदे, तौफिक शेख, गणेश निंबाळे, शरद देशमुख हे रेल्वे रुळाची नियमीत पहाणी करत होते. यावेळी कोणीतरी खोडसाळपणे जिवीताला हानी होण्याच्या उद्देशाने चिंचवड ते आकुर्डी दरम्यान रेल्वेरुळावर दगड ठेवले होते. वेळेत ते दगड हटवल्याने मोठी हानी टळली. याप्रकरणी आरोपीवर भारतीय रेल्वे अधिनीयम 1989 कलम 150 (1) (अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




# व्याजदर कपातीला मुहूर्त कधी ?

**व्याजदर कपातीची यथास्थिती राखली जाईल, अशी सार्वत्रिक अपेक्षा होती आणि तिलाच न्याय मिळाला. रिझर्व्ह बँक गव्हर्नर शक्तिकांत दास यांचा या संबंधाने ध्यासच इतका की, त्यांनी कौटिल्याच्या 'अर्थशास्त्रा'तील भलत्याच संदर्भातील 'स्थिरते'ची महती सांगणाऱ्या उद्धरणानेच त्यांच्या समालोचनाला शुक्रवारी सकाळी सुरुवात केली.**



दर दोन महिन्यांनी पुनर्आढाव्यासाठी म्हणून होणाऱ्या बैठकीचे फलित हेच की, व्याजदराला हात लावला गेला नाही आणि भूमिकेतही कोणताच बदल नाही! अगदी चलनवाढीबद्दलचे इशारे आणि विकासाबद्दलचा गव्हर्नरांचा आशावादही पुनरुक्तीचा प्रत्यय देणारा होता. 'महागाईसंबंधाने आमचे लक्ष्य २ ते ६ टक्के नव्हे, तर ४ टक्क्यांचा नेमका वेध घेणारे आहे,' असे दास म्हणाले. पण त्यांनी आवर्जून जोर देत दोनदा उद्धृत केलेले हे वाक्यही ऑगस्टमधील म्हणजे मागच्या आढाव्याच्या बैठकीतील विधानाचीच शब्दशः पुनरावृत्तीच! मग प्रश्न उपस्थित होतो की, तीन दिवस चाललेल्या रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीच्या बैठकीने साधले काय? एकंदरीत, अन्नधान्य महागाई, तेलाच्या आंतरराष्ट्रीय किमतीतील वाढ आणि अस्थिर जागतिक अर्थकारणातील जोखीम अधोरेखित करताना, देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनवाढीचा दर चालू आर्थिक वर्षात साडेसहा टक्के राहण्याचा अंदाज आणि किरकोळ महागाई दराची मात्रादेखील सरासरी ५.४ टक्क्यांवर राहण्याचे रिझर्व्ह बँकेचे अनुमानसुद्धा कायम आहे. यंदा त्यातही कोणताच बदल करावासा तिला वाटला नाही. त्यामुळे असलेले बँक दर कायम राहिले आणि सर्वसामान्यांसाठीच्या व्याजदरांत काही बदल होण्याची शक्यताही मावळली. त्याच वेळी पावसाने पाठ फिरवल्याने खरिपाची पिके लक्षणीय प्रमाणात सुकून गेली. त्यामुळे खरिपातील उत्पादन तुटीचे, शिवाय जलसाठ्याचे सध्याचे प्रमाण पाहता रब्बी पिकांनाही जोखीम शक्य आहे. याचा परिणाम शेतीवर आणि पर्यायाने ग्रामीण मागणीवरही दिसून येईल. तरी गव्हर्नर दास यांनी एकाच दमात एकापाठोपाठ ही दोन स्थितीदर्शक जी विधाने केली त्यात विसंगती आहे, असे त्यांना वाटले नाही. किंबहुना ती वस्तुस्थितीकडे केलेली डोळेझाकच आहे. पैशाच्या पुरवठ्याला बांध घातला, तरलता कमी केली आणि त्यातूनच चलनवाढ काबूत आणण्याचे प्रयास सफल ठरू शकतात. त्यामुळे रोकडतरलतेला लगाम घालण्यासाठी रिझर्व्ह बँकेची पावलेच केवळ कठोर बाण्याची म्हणता येतील. देशापेक्षा देशाबाहेरील स्थिती इतकी बेभरवशाची आहे की, तिचा थांग लावता येणे अवघड बनले आहे. अशा स्थितीत कोणतेही साहस करण्यापेक्षा जे चालले आहे तेच पुढे रेटणे योग्य ठरेल, असा सोपा मार्गच पतधोरण समितीने निवडलेला दिसतो. मागील दीड वर्षांत कर्जावरील व्याजाचे दर तब्बल अडीच टक्क्यांनी वाढले आहेत. हे पाहता व्याजदराबाबत संवेदनशील असणाऱ्या ग्राहक, उद्योजक, उत्पादक अशा सर्वच घटकांसाठी आणखी काही काळ स्थिर दराचे वातावरण राहणे हे स्वागतार्हच ठरेल. व्याजदर तसेच राहिले, तरच ते पुढे जाऊन घसरण्याची शक्यता वाढते, हेही खरेच. त्या अंगाने ही यथास्थिती अवस्था आश्वासकच म्हणावी लागेल. मात्र यातून सूचित होते ती गोष्ट हीच की, संपूर्ण आर्थिक वर्षांत म्हणजे मार्च २०२४ अखेपर्यंत, व्याजदराला हात न लावण्याचे सातत्य कायम राखले जाईल. म्हणजे आणखी दोन बैठकांतून जैसे थे अथवा तात्पुरत्या विश्रामाचीच री ओढली जाईल. बहुतांश विश्लेषकांचा निष्कर्षही हाच की, एप्रिल २०२४ मध्ये दरकपातीचे पाऊल टाकले जाईल. लोकसभा निवडणुकांच्या तोंडावर मतदार दुखावता कामा नये, या सत्ताधाऱ्यांच्या अपेक्षेबरहुकूम सारे काही अनुकूल घडवायलाच हवे.. हे तर साऱ्यांना माहीतच आहे. पण आणखी सुमारे पाच महिन्यांनी रिझर्व्ह बँक व्याजदर कमी करेल आणि नेमकी तेव्हाच लोकसभा निवडणुकीची लगबगही सुरू झाली असेल, हा मात्र निव्वळ योगायोग ठरेल! त्यामुळे भूमिका-सातत्याचा नाद सोडून वेगळे काही योजण्याचा तो मुहूर्तही खरे तर तितकाच स्वाभाविक!

## संपादकीय »

# क्रिकेटोत्सव!

***क्रीडा स्पर्धा नियोजन म्हणजे केवळ संकुलांची उभारणी नाही, तर त्यासाठी अवाढव्य नियोजन, सखोल समन्वय लागतो. या स्पर्धेच्या सुरुवातीपर्यंत तरी तो पुरेसा दिसून आला नाही.***

क्रिकेटमधील 'महासंग्रामा'ला गुरुवारी अहमदाबादेत सुरुवात झाली असे म्हणावे, तर अशा प्रसंगी समर्पक असे बिगूल सोडाच, पण पिपाण्यांचा आवाजही कोठे कानावर पडला नाही. प्रेक्षकसंख्याही एखाद्या रणजी सामन्यासाठी असावी, तशी उदासीन. सव्वा लाखाच्या मैदानामध्ये ३० हजारांचीही उपस्थिती नव्हती. आगामी निवडणुकांसाठीची प्रचारव्यग्रता असेल किंवा इंग्लंड-न्यूझीलंड सामना पुरेसा महत्त्वाचा नसेल, किंवा या स्टेडियममधील पुढील काही अत्यंत महत्त्वाच्या सामन्यांसाठी सदेह उपस्थिती अधिक महत्त्वाची वाटली म्हणून असेल, पण राष्ट्रीय आणि बीसीसीआय नेतृत्वही या सामन्याकडे फिरकले नाही. इंग्लंड- न्यूझीलंड उद्घाटनाचा सामना, तोही अहमदाबादेत होणे हे यापूर्वीही घडले होते. १९९६ मधील विश्वचषक स्पर्धेची सुरुवात इंग्लंड-न्यूझीलंड सामन्यानेच झाली होती.

**मर्यादित षटकांच्या क्रिकेटमागे मूळ प्रेरणा काय होती? सुमारे ६० वर्षांपूर्वी विशेषतः इंग्लंडमध्ये क्रिकेट जगते की मरते अशी परिस्थिती निर्माण झाली होती. दरवर्षी भरणाऱ्या कौन्टी क्रिकेटच्या जत्रेला भाविकांची उपस्थिती घटत चालली होती. परंपरागत यात्रेकरू तर इतिहासजमा झाले होते. यातून मार्ग काढण्यासाठी हमखास निकाल लागणाऱ्या 'इन्स्टंट क्रिकेट'चा तोडगा निघाला.**

# क्रिकेटला संजीवनी देणारे सामने

कौन्टी स्पर्धेत भाग घेणाऱ्या अव्वल दर्जाच्या १७ संघांमध्ये बाद फेरी पद्धतीने सामने खेळण्यात आले. मुख्य म्हणजे दाढी करण्यासाठी वापरायच्या रेझरचे उत्पादन करणारी प्रख्यात कंपनी 'गिलेट' या स्पर्धेची प्रायोजक होती. पहिल्याच वर्षात त्या स्पर्धेला प्रेक्षकांकडून जो जबरदस्त प्रतिसाद मिळाला तोच भावी काळाच्या दृष्टीने सूचक होता. "आय हॅव सीन द फ्युचर अँड इट वर्क्स" असे रशियातील क्रांती पाहिलेल्या एका अमेरिकी बुद्धिवंताने म्हटले होते. सुरुवातीच्या काही कडवट प्रतिक्रियांनंतर मर्यादित षटकांच्या क्रिकेटने जे अतुलनीय यश मिळविले, ते पाहता रशियन क्रांतीसंबंधीच्या वरील विधानाची आठवण होते. गिलेट कप पाठोपाठ जॉन प्लेअर संडे लीग, बेन्सन अँड हेजेस कप यासारख्या मर्यादित षटकांच्या क्रिकेट स्पर्धांना इंग्लंडमध्ये उधाण आले. तरीही मर्यादित षटकांच्या क्रिकेटचा पहिला आंतरराष्ट्रीय सामना झाला तो अनपेक्षितपणेच. ३१



डिसेंबर १९७० रोजी इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियादरम्यान सुरू होणारा तिसरा कसोटी सामना पावसामुळे होऊ शकला नाही. पहिले चार दिवस फुकट गेल्यावर नवीन वर्ष साजरे करण्यासाठी त्या कसोटी सामन्याच्या शेवटच्या दिवशी ४० मर्यादित षटकांचा सामना दोन देशांत खेळला गेला. ५ जानेवारी रोजी झालेला तोच मर्यादित षटकांचा पहिला आंतरराष्ट्रीय सामना. प्रदर्शनीय सामन्याप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या त्या सामन्याला तुडुंब गर्दी झाली होती. ते दृश्य खरोखरच विलोभनीय होते. कसोटी क्रिकेटचे टेन्शन खेळाडूंना नव्हते आणि प्रेक्षकांना तर नव्हतेच नव्हते. चित्तथरारक क्रिकेट त्यादिवशी मनमुराद अनुभवायला मिळाले. रंगेल ऑस्ट्रेलियन क्रिकेट शौकिनांची ती अनोखी जत्राच होती. त्यात बिअर कॅनवाले तरुण होते, तसेच सूर्यप्रकाशाची मजा लुटण्यासाठी आसुसलेल्या स्वीमिंग सूटमधील अर्धवस्त्रांकित मोहक तरुणी होत्या. त्याचबरोबर रसिकता जपणारे ज्येष्ठही होते. मर्यादित षटकांच्या सामन्याचा तो आंतरराष्ट्रीय प्रयोग चांगलाच यशस्वी झाला होता. शिवाय १९८१ मध्ये दक्षिण आफ्रिकेची आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेतून हकालपट्टी झाल्याने ऑस्ट्रेलिया, इंग्लंड यांच्या क्रिकेट कॅलेण्डरमध्ये काही रकाने रिकामे राहिले होते. ती उणीव भरून काढण्यासाठी जागतिक स्पर्धा भरविण्याची कल्पना पुढे आली आणि ती 'प्रुडेन्शिअल अॅश्युरन्स कंपनी'ने उचलून धरली. 'प्रुडेन्शिअल कप' म्हणून प्रसिद्धीस आलेली हीच ती स्पर्धा- क्रिकेटच्या इतिहासातील पहिलीवहिली आंतरराष्ट्रीय जत्रा. त्या जत्रेवर 'प्रुडेन्शिअल अॅश्युरन्स कंपनी'ने सुरुवातीला जितका खर्च केला त्याच्या दुप्पट वसुली झाली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पोलिसांवर दगडफेकीचा प्लॅन टोपेंचा!

## फडणवीस प्रतिष्ठानचा आरोप; सीबीआय चौकशीची मागणी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जालना येथील आंतरवली सराटीत पोलिसांवर दगडफेक करण्याचा प्लॅन शरद पवार गटाचे आमदार राजेश टोपे यांनी रचला होता, असा गंभीर आरोप देवेंद्र फडणवीस प्रतिष्ठाणकडून करण्यात आला आहे. याप्रकरणी राजेश टोपे यांची सीबीआय चौकशी करा, अशी मागणीही प्रतिष्ठाणकडून करण्यात आली आहे.**

जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी गावात मराठा समाजाच्या आंदोलनादरम्यान पोलिस व आंदोलकांमध्ये झालेल्या झटापटीवरुन अवघे राज्य ढवळून निघाले होते. पोलिसांनी आंदोलकांवर अमानूष लाठीमार केल्याने राज्यभरात संतापाची लाट उसळली होती. तर, आंदोलकांनी दगडफेक केल्याने लाठीमार केला, असे स्पष्टीकरण पोलिसांनी दिले आहे. त्यानंतर आता देवेंद्र फडणवीस प्रतिष्ठानने या घटनेवरुन राजेश टोपेंवर गंभीर आरोप केले आहेत. देवेंद्र फडणवीस प्रतिष्ठाणचे अध्यक्ष आसाराम डोंगरे यांनी आरोप केला आहे की, पोलिसांवर दगडफेक करण्याचा आधीपासूनच प्लॅन करण्यात आला होता. आंदोलनात




गरबड झाल्यास पोलिसांवर दगडफेक करण्याचे राजेश टोपे आणि त्यांच्या स्वीय सहायकांसह राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचा प्लॅन होता.

याबाबत प्रतिष्ठानकडून जालना पोलिस अधीक्षकांनाही निवेदन देण्यात आले आहे. पोलिसांना दिलेल्या निवेदनात देवेंद्र फडणीस प्रतिष्ठानने म्हटले आहे की, 1 सप्टेंबर रोजी आंतरवाली सराटी येथे शांततेच्या मार्गाने मराठा समाज बांधवाचे उपोषण चालू होते. तेथे पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. या पोलिस बंदोबस्तामध्ये काही समाजकंटक व जातीवादी लोक बाहेर गावावरून आले होते. हे लोक राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते, शहागड व बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील असून, या समाजकंटकांनी पोलिस बांधवावर घरावरती जाऊन दगडफेक केली. दगडफेक केल्यामुळे आंदोलन चिघळले आणि नाईलाजास्तव पोलीस बांधवाना लाठीचार्ज, अश्रूधुरांचा मारा करावा लागला. निवेदनात पुढे म्हटले आहे की, 27 ऑगस्ट रोजी आमदार राजेश टोपे व त्यांच्या कार्यकर्त्यांची अंकुश सहकारी साखर कारखाना येथे एक गुप्त बैठक झाली होती. त्यामुळे, आमदार राजेश टोपे व त्यांचे स्वीय सहाय्यक, राष्ट्रवादी कार्यकर्त्यांची पोलिस व सीबीआय मार्फत चौकशी करण्यात यावी.

### बाहेरुन समाजकंटक आणले

» पोलिसांना दिलेल्या निवेदनात देवेंद्र फडणीस प्रतिष्ठानने म्हटले आहे की, 1 सप्टेंबर रोजी आंतरवाली सराटी येथे शांततेच्या मार्गाने मराठा समाज बांधवाचे उपोषण चालू होते. तेथे पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. या पोलिस बंदोबस्तामध्ये काही समाजकंटक व जातीवादी लोक बाहेर गावावरून आले होते. हे लोक राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते, शहागड व बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील असून, या समाजकंटकांनी पोलिस बांधवावर घरावरती जाऊन दगडफेक केली. दगडफेक केल्यामुळे आंदोलन चिघळले आणि नाईलाजास्तव पोलीस बांधवाना लाठीचार्ज, अश्रूधुरांचा मारा करावा लागला.

# 9 मंत्र्यांना कॅबिनेटमधून डच्चू मिळणार!

## कितीही धुतले तरी डाग जाणार नाहीत : वडेट्टीवार

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**वॉशिंग मशीनमध्ये धुवून कितीही स्वच्छ केले तरी येत्या 10-12 दिवसांत गंभीर स्वरूपाचे आरोप असणाऱ्या 9 मंत्र्यांना मंत्रिमंडळातून डच्चू मिळणार असल्याचा दावा राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी शनिवारी येथे प्रसार माध्यमांशी बोलताना केला.**

गंभीर आरोप असतानाही काही मंत्र्यांना गोमूत्र शिंपडून आणि वॉशिंग मशीनमध्ये टाकून स्वच्छ केल्या जात आहे. मात्र "जिद्दी दाग निकलतेही नहीं' अशी परिस्थिती या 9 मंत्र्याची झाली आहे. या 9 मंत्र्याची नावे सध्या सांगू शकत नाही. पण हे 9 मंत्री विद्यमान मंत्रिमंडळात राहाणार नाहीत हे स्पष्ट आहे, असे विजय वडेट्टीवार यांनी ठामपणे सांगितले. हसन मुश्रीफ यांच्यावर पीएमएलए कोर्टाने गंभीर स्वरूपाचे निरीक्षण नोंदवले आहे. त्यांनी शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले आहे. सरकारला थोडीतरी ईमानदारीची चाड असेल, तर हसन मुश्रीफ यांना त्या पदावर एक मिनिटही ठेवू नये. त्यांनी त्यांची तत्काळ मंत्रिमंडळातून हक्कालपट्टी करावी, असे विजय वडेट्टीवार म्हणाले. या 9 भ्रष्ट मंत्र्यांवर आम्ही आरोप केले नाहीत. हे आरोप भारतीय जनता पक्षाने केलेल्या तक्रारी व आरोप आहेत. त्या तक्रारीनंतरच यांच्यावर चौकशी व ईडीने नोटीस बजावली होती, असे ते म्हणाले. सध्या जागा वाटपाचे सूत्र दिल्लीमध्येच ठरत आहे. प्रदेश अध्यक्षांकडून विभागीय कार्यकर्त्यांच्या बैठीकचे सत्र कोकणपासून सुरू झाले आहे. नागपूरला 12 तारखेला बैठक होणार आहे, असे ते म्हणाले. राज्यात रूग्णालयात सुरू असलेल्या मृत्यूसत्रात रुग्णालयाचा दोष नसून सरकारचा दोष आहे. त्यामुळे सरकारवर कलम 302 चा गुन्हा नोंदवला गेला पाहिजे. तीन-तीन वेळा स्वच्छतेचे टेंडर काढल्यावर देखील टेंडर पास करीत नाही. 40% च्यावर स्वच्छता कामगार नाही, निधी उपलब्ध नाही. रुग्णांना उपचार व औषधी वेळेवर मिळू शकली नाही. यामध्ये दोष कुणाचा आहे. त्याकरिता सरकारवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी यावेळी केली. नितीन गडकरींनी केलेले काम व त्यांचा संघर्ष चित्रपटाच्या माध्यमातून दाखवल्या जात आहे ही चांगली गोष्ट आहे. भविष्यात सत्ता आली तर या पदावरून त्यांना वरच्या पदावर जाण्यासाठी देखील आमच्या शुभेच्छा राहतील. कारण पुढे आमची सत्ता येणार आहे. त्यांच्यावर चित्रपट निघतोय. मात्र खरा चित्रपट दाखवण्यासाठी त्यांना भविष्यात इंडियासोबत यावे लागेल, असे मला वाटते.



### सरकारवर 302 चा गुन्हा नोंदवा

» रूग्णालयात सुरू असलेल्या मृत्यूसत्रात रुग्णालयाचा दोष नसून सरकारचा दोष आहे. त्यामुळे सरकारवर कलम 302 चा गुन्हा नोंदवला गेला पाहिजे. तीन-तीन वेळा स्वच्छतेचे टेंडर काढल्यावर देखील टेंडर पास करीत नाही. 40% च्यावर स्वच्छता कामगार नाही, निधी उपलब्ध नाही. रुग्णांना उपचार व औषधी वेळेवर मिळू शकली नाही. यामध्ये दोष कुणाचा आहे. सरकारवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी मागणी वडेट्टीवार यांनी यावेळी केली.

# भुजबळांची थेट शरद पवारांशी तुलना!

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

ज्यावेळी शरद पवार काँग्रेसच्या बाहेर पडले. त्यावेळेला पवारांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसची स्थापना केली. त्यावेळी साहेबांचा उजवा हात म्हणून मी काम पाहिले. शरद पवार सांगतात की मी राष्ट्रवादी पक्षाचा संस्थापक अध्यक्ष आहे, मग पवार साहेब मला तुम्हाला विचारायचं आहे की, मी सुद्धा या महाराष्ट्राचा पहिला राष्ट्रवादीचा प्रांताध्यक्ष आहे, आमचाही पक्ष बांधणीत खारीचा वाटा आहे, असा टोला लगावत छगन भुजबळ यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. उपमुख्यमंत्री अजित पवार हे आज म्हणजेच शनिवारी नाशिक दौऱ्यावर आहेत. याचवेळी कळवणला शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी छगन भुजबळ बोलत होते. गेल्या दोन दिवसांपासून राष्ट्रवादी पक्षाच्या चिन्हांवरून वाद सुरु असून निवडणूक आयोगाकडे सुनावणी सुरु आहे. या पार्श्वभूमीवर थेट शरद पवार निवडणूक आयोगाकडे तहान मांडून होते. यावर छगन भुजबळ यांनी निशाणा साधला आहे. पवार साहेब म्हणाले होते की मी काही कोर्ट कचेरी करणार नाही. पण आता कालपासून बघतो आहे, स्वतः पवार साहेबच तिकडे इलेक्शन कमिशनच्या ऑफिसमध्ये गेले. ते सांगतात की राष्ट्रवादी पक्षाचा मी संस्थापक अध्यक्ष आहे, मग पवार साहेब मला तुम्हाला विचारायचं आहे कि, मी संस्थापक प्रांताध्यक्ष आहे की नाही? ज्यावेळी शरद पवार कॉंग्रेसच्या बाहेर पडले. त्यावेळेला शरद पवार यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना केली. त्यावेळी उजवा हात म्हणून मी काम पाहिले, असेही भुजबळ म्हणाले. छगन भुजबळ यांनी यावेळी त्यावेळच्या पक्ष चिन्हांबाबतची आठवण सांगताना म्हणाले की, किंबहुना माझ्याकडे विरोधी पक्ष नेत्याचा जो बंगला होता, तिथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना झाली. तिथे राष्ट्रवादी पक्षाचा झेंडा कसा असेल हे ठरलं, चिन्ह तिथेच ठरलं आणि तिथेच प्रतिज्ञापत्रे सादर केली. त्यावेळी आम्ही दोघांनी निवडणुकांचा प्रचार देखील याच चिन्हावर आणि झेंड्यावर केला.

# मणिपूर हिंसेवर संयुक्त राष्ट्राकडून चिंता!

## » मानवाधिकार कार्यकर्त्यांना सुरक्षा देण्याचे आवाहन

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मणिपूरमध्ये दुसऱ्यांदा हिंसाचार भडकल्यानंतर संयुक्त राष्ट्राने राज्यातील परिस्थितीवर चिंता व्यक्त केली आहे. संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोगाने (UNHR) शुक्रवारी (6 ऑक्टोबर) सोशल मीडियावर लिहिले - मणिपूर हिंसाचारावर बोलणारे मानवाधिकार कार्यकर्ते बबलू लिथोंगबम यांना मिळालेल्या धमक्यांबद्दल आम्ही चिंतित आहोत.**

5 ऑक्टोबर रोजी हिंसक जमावाने इम्फाळ पश्चिम येथील कैथेलमांगबी येथील बबलू लिथोंगबम यांच्या घरावर हल्ला केला. UNHR ने या घटनेमागे मेईतेई लिपुन्स आणि आरामबाई टेंगोल यांना जबाबदार धरले. बबलू लिथोंगबम, त्यांचे कुटुंब आणि घर यांना सुरक्षा पुरवण्याची मागणीही त्यांनी अधिकाऱ्यांकडे केली. मानवाधिकार कार्यकर्ते बबलू लिथोंगबम यांनी मेईतेई कट्टरवादी संघटना मेईतेई लिपुन्स आणि आरामबाई टेंगोल यांच्यावर टीका केली आहे.

मेईतेई लिपुन्स यांनी 5 ऑक्टोबर रोजी प्रसिद्धीपत्रकाद्वारे बबलू लिथोंगबम आणि वृंदा थौनाओजम यांच्यावर बहिष्कार टाकण्याची घोषणा केली होती.



त्याच दिवशी सायंकाळी जमावाने बबलू लिथोंगबम यांच्या घराची तोडफोड केली. मात्र, त्यावेळी बबलू घरी नव्हते.

हल्ल्याच्या पाच दिवसांपूर्वी बबलूंनी बोलताना घरावर हल्ला होण्याची भीती व्यक्त केली होती. तथापि, हल्ल्यानंतर, बबलू लिथोंगबम यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला, ज्यामध्ये त्यांनी मणिपूर हिंसाचाराच्या सुरुवातीच्या दिवसांत एका मुलाखतीत दिलेल्या वक्तव्याबद्दल मणिपूरच्या लोकांची माफी मागितली. बबलू लिथोंगबम यांनी राज्याचे मुख्यमंत्री एन बिरेन यांच्यावर टीका केली आहे. मणिपूरमधील हिंसाचार संपवण्यासाठी भाजपने एन बीरेन सिंग यांच्याऐवजी दुसऱ्या भाजप नेत्याला मुख्यमंत्री बनवावे, असे ते म्हणाले होते. भाजप सरकारला कुकी समाजाशी चर्चा करण्याचा सल्लाही त्यांनी दिला. राज्यात 23 सप्टेंबर रोजी मोबाईल इंटरनेटवरील बंदी उठवल्यानंतर दोन विद्यार्थ्यांच्या मृतदेहाची छायाचित्रे समोर आली, ती सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. फोटोमध्ये दोघांचेही मृतदेह जमिनीवर पडलेले दिसत आहेत. तसेच मुलाचे डोके कापण्यात आले आहे. मात्र, अद्याप दोघांचेही मृतदेह सापडलेले नाहीत. जुलै महिन्यात एका दुकानात लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दोन्ही विद्यार्थी दिसले होते, मात्र तेव्हापासून त्यांचा शोध लागला नव्हता.

### मणिपूरमध्ये आतापर्यंत 180 जणांचा मृत्यू

» मणिपूरमध्ये गेल्या 4 महिन्यांपासून सुरू असलेल्या जातीय हिंसाचारात आतापर्यंत 180 जणांचा मृत्यू झाला आहे. तर 1100 हून अधिक लोक जखमी झाले आहेत. एवढेच नव्हे तर जाळपोळीचे 5172 गुन्हे नोंदवण्यात आले असून त्यात 4786 घरे आणि 386 धार्मिक स्थळांची जाळपोळ आणि तोडफोड करण्यात आली आहे.

# इस्रायलने केली युद्धाची घोषणा!

## » गाझावर इस्रायलच्या बॉम्बवर्षावात 198 ठार

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**हमासच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून इस्रायलने गाझा पट्टीतील 17 लष्करी कंपाऊंड आणि 4 लष्करी मुख्यालयांवर हल्ला केल्याचा दावा केला आहे. यामध्ये आतापर्यंत 198 पॅलेस्टिनींचा मृत्यू झाला आहे, तर 1600 हून अधिक लोक जखमी झाले आहेत. अल जझीराच्या म्हणण्यानुसार, 1000 हून अधिक पॅलेस्टिनी इस्रायलमध्ये दाखल झाले आहेत. 1948 नंतर असे पहिल्यांदाच घडले आहे.**



### दहशतवादी रस्त्यावर फिरताना दिसले

» इस्रायलने या दहशतवादी हल्ल्याला अचानक हल्ला म्हटले आहे. सोशल मीडियावर अनेक व्हिडिओ समोर येत आहेत, ज्यामध्ये दहशतवादी फिरताना दिसत आहेत. मात्र, या व्हिडिओंची पुष्टी झालेली नाही. तेल अवीवमध्ये सैन्याची संख्या वाढवण्यात आली आहे. लष्कर हमासच्या ठाण्यांवर हल्ले करत आहे.

त्याचवेळी हमासने सकाळी डागलेल्या 5 हजार रॉकेटमुळे आतापर्यंत 40 इस्रायलींचा मृत्यू झाला असून 750 जण जखमी झाले आहेत. गाझा पट्टीतून झालेल्या हल्ल्यानंतर इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी युद्धाची घोषणा केली होती. मंत्रिमंडळाच्या तातडीच्या बैठकीनंतर ते म्हणाले होते - हे युद्ध आहे आणि आम्ही नक्कीच जिंकू. याची किंमत शत्रूंना चुकवावी लागेल. इस्रायलमधील बिघडलेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारतीय दूतावासाने तेथे उपस्थित असलेल्या नागरिकांसाठी एक सूचना जारी केली आहे. त्यांना सतर्क आणि सुरक्षित राहण्यास सांगण्यात आले आहे. तसेच, इस्रायलहून भारताकडे जाणारी आणि जाणारी उड्डाणे बंद करण्यात आली आहेत. कठीण काळात भारत इस्रायलच्या जनतेसोबत असल्याचे पंतप्रधान मोदींनी म्हटले आहे. अनेक लोकांसह इस्रायलचे जनरल निमरोद अलोनी यांना ओलीस ठेवल्याचा दावा हमासने केला आहे. ओलीसांची संख्या इतकी आहे की त्यांच्या बदल्यात ते इस्रायली तुरुंगात कैद असलेल्या सर्व पॅलेस्टिनींना मुक्त करू शकतात. त्यांच्या सुटकेसाठी इस्त्रायली सैन्याने ओफकीम भागातील एका घराला वेढा घातला आहे. येथे ते हमासच्या सैनिकांशी बोलत आहे. पॅलेस्टिनी संघटना हमासने इस्रायलच्या 7 शहरांवर रॉकेट हल्ले केले आहेत. अल जझीराच्या वृत्तानुसार, शनिवारी सकाळी आठच्या सुमारास राजधानी तेल अवीव, सडेरोट, अश्कलोनसह 7 शहरांवर रॉकेट डागण्यात आले. हे रॉकेट निवासी इमारतींवर पडले आहेत. 6 जणांचा मृत्यू झाला आहे. तर 100 हून अधिक लोक जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा वाढू शकतो. इस्रायलच्या वृत्तानुसार, हमासने या हल्ल्यांची जबाबदारी स्वीकारली असून इस्रायलविरोधात लष्करी कारवाई सुरू केली आहे. येथे इस्त्रायली लष्कराने 'ऑपरेशन आयर्न स्वॉर्ड' सुरू केले आहे. लष्कर हमासच्या ठाण्यांवर हल्ले करत आहे. या हल्ल्याशी संबंधित व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. अश्केलॉन शहरातील हल्ल्याच्या व्हिडिओमध्ये रस्त्यांवर उभ्या असलेल्या इमारती आणि वाहने जळताना दिसत आहेत. CNN च्या रिपोर्टनुसार, तेल अवीवच्या गेडेरोट भागात रॉकेट पडल्याने एका 70 वर्षीय महिलेचा मृत्यू झाला आहे. तर 15 जण जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे.

# हरियाणामध्ये आप'चा स्वबळाचा नारा!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

आम आदमी पक्षाने शुक्रवारी हरियाणामधील सर्व दहा लोकसभा मतदारसंघासाठी प्रभारी नेमले आहेत. शेजारी असलेल्या पंजाब राज्याच्या मंत्रीमंडळातील मंत्र्यांची नेमणूक करण्यात आली आहे. पंजाबप्रमाणेच हरियाणातही पक्षाचा विस्तार करण्यासाठी सर्व्याच सर्व ९० विधानसभा मतदारसंघामध्येही पंजाबमधील नेत्यांची प्रभारीपदी नियुक्ती केली. हे प्रभारी पंजाबमधील महत्त्वाचे नेते असून काही मंडळी सरकारमधील आहेत, तर ७० जण विविध महामंडळे आणि महापालिकांचे अध्यक्ष आहेत. २०२४ मध्ये एप्रिल किंवा मे महिन्यात लोकसभा निवडणुका होण्याची शक्यता आहे, तर त्याच वर्षी ऑक्टोबर महिन्यात हरियाणा विधानसभेच्या निवडणुका होऊ शकतात. सध्या आम आदमी पक्षाने काँग्रेसप्रणीत इंडिया आघाडीत सहभाग घेतला असला तरी हरियाणामधील लोकसभा आणि विधानसभेच्या सर्व्याच सर्व जागा स्वबळावर लढविण्याचा निर्णय घेतला आहे. पंजाबचे कॅबिनेट मंत्री हरपाल सिंग चिमा यांना सोनिपत, बालजिंदर कौर यांना हिसार, चेतन सिंग यांना कुरुक्षेत्र, हरभजन सिंग यांना कर्नाल, कुलदीप सिंग धालीवाल यांना रोहतक, अनमोल गगन मान यांना अंबाला, ब्राम शंकर जिम्पा यांना फरिदाबाद, लालजीत सिंग भुल्लर यांना भिवानी महेंद्रगड, लाल चंद यांना गुरुग्राम आणि बलकर सिंग यांना सिरसा लोकसभेची जबाबदारी देण्यात आली आहे. 'आप' हरियाणाचे उपाध्यक्ष अनुराग ढांडा यांनी एक्स (जुने ट्विटर) वर पोस्ट टाकून म्हटले, "हरियाणा लोकसभेसाठी नेमलेल्या सर्व प्रभारींचे मनपूर्वक अभिनंदन. तुमच्या सहकार्याने आपण सर्वजन हरियाणाच्या प्रचाराची धडाक्यात सुरुवात करुया." ढांडा म्हणाले, "पंजाबमध्ये ज्यांनी पक्षासाठी अतिशय उत्तम काम केले आहे, अशाच नेत्यांची नियुक्ती हरियाणामध्ये मतदारसंघाचे प्रभारी म्हणून केलेली आहे. या रणनीतीमुळे हरियाणामधील लोकांनाही समजेल की, छोट्या छोट्या कुटुंबातून आलेल्या लोकांनाही पक्षाने मंत्रीपदासारखी मोठी जबाबदारी दिली आहे. यातून कार्यकर्त्यांनाही कठोर परिश्रम करण्याची प्रेरणा मिळेल. हरियाणाच्या सीमेलगत असलेल्या पंजाब आणि दिल्लीत 'आप'चे सरकार आहे. तरीही हरियाणामध्ये पक्षाचे फार काही वजन तयार झालेले नाही.



# भावाच्या वाढदिवशी अपूर्वाच्या डोळ्यात पाणी!

अभिनेत्री अपूर्वा नेमळेकर ही नेहमी आपल्या अभिनयाने आणि बिनधास्त स्वभावामुळे चर्चेत असते. 'शेवंता' या भुमिकेपासून ओळखली जाणारी अपूर्वा ही बिग बॉस मराठी नंतर अधिकच प्रसिद्ध झाली. आता अपुर्वा 'प्रेमाची गोष्ट' या मालिकेत झळकत आहे. अपूर्वा नेमळेकर ही सोशल मीडियावर कायमच सक्रीय असते. काही महिन्यापूर्वी तिच्या सख्ख्या धाकट्या भावाचे अचानक निधन झाले. 15 एप्रिल रोजी अपूर्वाच्या लहान भावाचे ओंकार नेमळेकरचे हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले होते. आज ओंकारचा वाढदिवस आहे. लाडक्या भावाच्या वाढदिवसाला तो आपल्यात नसण्याचं दु:ख अपुर्वाने एका पोस्टद्वारे मांडलं आहे. अपूर्वाने भावाच्या वाढदिवसानिमित्त सोशल मीडियावर भावाचे फोटो शेयर करत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. या पोस्टमध्ये अपुर्वा लिहिते की, दरवर्षी ७ ऑक्टोबर हा दिवस खूप मजेशीर आणि उत्साहाने भरलेला असायचा. आपल्या बालपणात या दिवशी घरी बनवणाऱ्या केकची तयारी, सजावट आणि वाढदिवसाच्या कपडे अशा अनेक गोष्टी असायच्या !!! आणि जसजसे आम्ही मोठे झालो, तसतसे आवडत्या रेस्टॉरंटमध्ये जाऊन आणि आपल्या आवडत्या स्वादिष्ट पदार्थांवर ताव मारणे हे सर्व होतं...त्यावेळी खूप मजा यायची !! आपण आपल्या आठवणी साठवत आहोत हे कधीच कळलं नाही... पण देव तूला खूप लवकर घेऊन गेला आणि तुझ्याशिवाय आमचं आयुष्य अपूर्ण आहे. मला आशा आहे की तू स्वर्गातून आमच्याकडे हसतमुखाने पहात असशील कारण आज आम्ही तूझी आठवण नेहमीपेक्षा जास्त जपत आहोत. माझ्या लाडक्या ओम तुझी आठवण काढणं खुप सोपं आहे, मी ते दररोज करतो. ही फक्त तुला गमावण्याची वेदना आहे जी कधीही दूर होत नाही. माझ्या प्रिय भाऊ, तुला वाढदिवसाच्या शुभेच्छा. भविष्यात एक दिवस तू आणि मी पुन्हा एकत्र येऊ. आम्हाला तुमची खूप आठवण येते. मी तुझ्यावर प्रेम करतो माझ्या भावा" अशा शब्दात अपूर्वाने आपल्या लाडक्या भावाला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.सध्या तिची पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे.

## लव्ह लाईफबाबत बोलला सूरज पांचोली

अभिनेता सूरज पांचोली अलिकडेच लव्ह लाईफबद्दल बोलला. समजून घेणाऱ्या व्यक्तिसोबत राहून मला खूप आनंद होत असल्याचे अभिनेत्याने सांगितले. सूरजने सांगितले की, त्याच्या सध्याच्या मैत्रिणीने त्याला जिया खान प्रकरणाबद्दल कधीही विचारले नाही. सूरजने नुकतेच त्याच्या नात्याबद्दल आणि गर्लफ्रेंडबद्दल मोकळेपणाने सांगितले. मात्र, त्याने लेडी लव्हचे नाव उघड केले नाही. सिद्धार्थ काननला दिलेल्या मुलाखतीत सूरजने सांगितले की, जिया खान प्रकरणातील मीडिया ट्रायलमुळे त्याला अडचणींचा सामना करावा लागला. तर जियासोबतचे त्याचे नाते सर्वात कमी काळ टिकले. संवादादरम्यान सूरजला तुनिषा शर्मा आत्महत्या प्रकरणाबद्दल विचारण्यात आले. या प्रकरणात अभिनेत्रीचा प्रियकर शीझान खानला तिच्या मृत्यूप्रकरणी आरोपी मानले जात होते. या प्रकरणाबाबत बोलताना सूरज म्हणाले-'मीडिया ट्रायल लोकांवरील आरोप ठरवू शकत नाही.' प्रेमाबाबत सूरज म्हणाला- मला असे वाटत नाही, माझा प्रेमावर विश्वास आहे. त्या प्रकरणानंतरही मी प्रेमात पडलो (जिया खान प्रकरण). सूरजला पुढे विचारण्यात आले की तो गेल्या सात वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये आहे का? आणि त्याच्या गर्लफ्रेंडचा त्याच्यावर किती विश्वास आहे. यावर तो म्हणाला- इतके दिवस नाही, पण मी सध्या रिलेशनशिपमध्ये आहे. आम्ही भूतकाळाबद्दल कधीही बोललो नाही. कदाचित त्याची गरजही नसेल.

## आताच सुधरा नाहीतर...!



महादेव ॲप हे प्रकरण सध्या देशभरात चांगलंच चर्चेत आलं आहे. या प्रकरणामुळे मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध कलाकारदेखील ईडीच्या रडारवर आहेत. ज्यात रणबीर कपूर, कपिल शर्मा, हुमा कुरेशी आणि हिना खान, अमिषा पटेल, श्रद्धा कपूर, सोनाक्षी सिन्हा, इम्रान हाशमी, बोमन इराणी, कॉमेडियन भारती सिंग आणि नेहा कक्कर यांचा समावेश आहे. ईडीच्या म्हणण्यानुसार या स्टार्सनी या ॲप्सची जाहिरात केली आहे. त्यांच्या प्रमोशनल इव्हेंटमध्येही या कालाकारांचा सहभाग होता. त्यामुळे आता ईडी त्यांची चौकशी करणार आहे. त्यातच आता बॉलिवूडची पंगा क्विन कंगना राणौतचं वक्तव्य चर्चेत आलं आहे. महादेव बेटिंग ॲपच्या प्रमोशनसाठी तिला करोडो रुपयांची ऑफर देण्यात आली होती मात्र कंगनाने ती ऑफर आणि या ॲपची जाहिरात करण्यास नकार दिल्याचा खुलासा केला. इतकच नाही तर आता कंगना रणौतने महादेव ॲप प्रकरणात सहभागी असलेल्या सेलिब्रिटींवरही निशाणा साधला आहे. कंगना रणौतने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीजवर याबाबच एक पोस्ट शेयर केली आहे. एका बातमीचा स्क्रीनशॉट शेअर करत कंगना लिहिते की, "हे एंडोर्समेंट मला एका वर्षात जवळपास 6 वेळा आलं, प्रत्येक वेळी मला खरेदी करण्यासाठीच्या या ऑफरमध्ये अनेक कोटी रुपये जोडले पण मी प्रत्येक वेळी नाही म्हणाले. हा नवा भारत आहे, स्वतःला सुधरवा नाहीतर तुम्हाला वठणीवर आणण्यात येईल." महादेव ॲपमध्ये पोकर, चान्स गेम्स, बॅडमिंटन, टेनिस, फुटबॉल, क्रिकेट आणि कार्ड गेम यांसारख्या अनेक ऑनलाइन गेमवर बेटिंग केली जाते. हे ॲप दुबईचे सौरभ चंद्राकर आणि रवी उरपल चालवत होते. या वर्षी फेब्रुवारीमध्ये महादेव ॲप प्रकरणातील मुख्य आरोपी सौरभ चंद्राकरच्या विवाह सोहळ्यात अनेक कलाकारांनी सहभाग घेतला होता. आता या कलाकारांची चौकशी करण्यात येणार आहे. त्यातच आता कंगना रणौतने महादेव ॲप प्रकरणात सहभागी असलेल्या सेलिब्रिटींवर निशाणा साधला आहे.

## अभिनेत्री परिणीती चोप्राचे जंगी स्वागत

परिणिती चोप्राच्या लग्नानंतरचा एक व्हिडिओ समोर आला आहे. हा व्हिडीओ तिच्या गृहप्रवेशाचा आहे. चड्ढा कुटुंबाने परिणितीचे मनापासून स्वागत केले आहे. सासरची ही स्टाइल तिला खूप आवडली, त्याचा आनंद तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. 24 सप्टेंबर 2023 रोजी परिणितीने खासदार राघव चड्ढासोबत लग्न केले. त्यांचा विवाह उदयपूरच्या हॉटेल लीला पॅलेसमध्ये झाला. लग्नानंतर दुसऱ्याच दिवशी परिणितीने लग्नाचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले. परिणितीच्या स्वागतासाठी चड्ढा हाऊस फुलांनी आणि दिव्यांनी सजवण्यात आले होते. आरती ओवाळत सासूने त्यांचे स्वागत केले. यादरम्यान कुटुंबीयांनी परिणीती आणि राघव यांना त्यांच्या नात्याबाबत काही प्रश्न विचारले. परिणितीने सांगितले की, तिनेच आधी राघवला प्रपोज केले होते व्हिडिओमध्ये परिणितीचे लग्नानंतरचे सर्व विधी पार पाडल्याचे दिसत आहे. राघवने विधीमध्ये रिंग शोधली. परिणितीचे सासरच्यांसोबतचे सुंदर नातेही पाहायला मिळाले. व्हिडिओच्या शेवटी राघवने सांगितले की, आता परिणीती चड्ढा झाली आहे. तर परिणितीने तिचे सासरचे कुटुंब जगातील सर्वात प्रेमळ कुटुंब असल्याचे वर्णन केले. ती म्हणाली की इथले लोक तिला राणीसारखे वागवत आहेत.



## अंकिता लोखंडे ठरली बिग बॉस 17 ची महागडी स्पर्धक?

ऐश्वर्या आणि आराध्या बच्चन या मायलेकी चांगल्याच चर्चेत असतात. अनेकदा इव्हेंट, पार्टीला या दोघी एकत्र दिसतात. ऐश्वर्या कायमच लेक आराध्याला सांभाळताना आणि सपोर्ट करताना दिसते. या मायलेकी पुन्हा एकदा चर्चेत आल्यात. ते म्हणजे प्रतिष्ठित अशा पॅरिस फॅशन शोमध्ये या दोघी सहभागी होणार आहेत. यासाठी त्यांनी खास मेकओव्हर केलेला दिसतोय. पॅरिस फॅशन वीकमध्ये सहभागी होण्यासाठी ऐश्वर्या राय बच्चन आणि तिची मुलगी आराध्या बच्चन आज मुंबईहून विमानाने निघाल्या. वृत्तानुसार, 3 ऑक्टोबर रोजी होणाऱ्या फॅशन वीकचा भाग होण्यासाठी ऐश्वर्या मुलीसह पॅरिसमध्ये असेल. पापाराझींनी ऐश्वर्या आणि आराध्याला मुंबई विमानतळाबाहेर क्लिक केले. आई-मुलीची जोडी एकदम स्टाइलिश आणि आरामदायक लूकमध्ये दिसल्या. पापाराझींनी ऐश्वर्या राय बच्चन आणि आराध्या बच्चन यांना त्यांच्या कारमधून उतरताना विमानतळाबाहेर स्पॉट केले. आई-मुलीच्या जोडीने एकमेकांचे हात धरले होते आणि कॅमेराकडे हसत त्यांनी फोटो क्लिक केले. ऐश्वर्याने संपूर्ण काळ्या पोशाखात अगदी सुंदर दिसत होती. तर आराध्या निळ्या रंगाच्या टीशर्टमध्ये आईच्या खांद्यावर हात ठेऊन चालत होती. वर्कफ्रंट बद्दल बोलायचं झालं तर ऐश्वर्या या वर्षी पोनियन सेल्व्हन 2 (PS 2) सिनेमात दिसली. या सिनेमाने बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी केली. चोळ साम्राज्यावर आधारीत हा भव्य दिव्य सिनेमा मणीरत्नम यांनी दिग्दर्शित केला.

# एशियन क्रिकेटमध्ये टीम इंडियाच 'भारी', सुवर्णपदकावर 'सवारी'!

## » अफगाणिस्तानला खराब रॅंकिंगचा बसला फटका

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**आशियाई क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या क्रिकेट स्पर्धेत भारताने सुवर्णपदक पटकावले आहे. पावसामुळे शनिवारी (७ ऑक्टोबर) सामना रद्द करण्यात आला. भारतीय कर्णधार ऋतुराज गायकवाडने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पावसामुळे सामना थांबवण्यात आला तेव्हा अफगाणिस्तानने १८.२ षटकात ५ गडी गमावून ११२ धावा केल्या होत्या. त्यानंतर हा सामना पूर्ण होऊ शकला नाही. त्यामुळे आयसीसी टी-२० क्रमवारीच्या आधारे भारताला विजेता घोषित करण्यात आले. या क्रमवारीत टीम इंडिया पहिल्या स्थानावर आहे. तर, अफगाणिस्तान दहाव्या स्थानावर आहे.**



भारतीय पुरुष क्रिकेट संघ प्रथमच एशियाडमध्ये सहभागी होण्यासाठी आला होता. त्याने पहिल्याच प्रयत्नात इतिहास रचला आणि सुवर्णपदक जिंकले. यापूर्वी २०१० मध्ये बांगलादेशने अफगाणिस्तानला हरवून सुवर्णपदक जिंकले होते, तर २०१४ मध्ये श्रीलंकेने अफगाणिस्तानला हरवून सुवर्णपदक जिंकले होते. अफगाणिस्तानचा संघ सलग तिसऱ्यांदा अंतिम फेरीत पोहोचला आणि त्यांना रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. हांगझोऊ येथील पिंगफेंग कॅम्पस क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. तसेच प्रथम फलंदाजीला आलेल्या अफगाणिस्तान संघाने १८.२ षटकांत ५ गडी गमावून ११२ धावा केल्या होत्या. यानंतर पावसाने व्यत्यय आणल्याने सामना पुढे जाऊ शकला नाही. अफगाणिस्तानसाठी सुरुवात अजिबात चांगली झाली नव्हती. संघाने दुसऱ्या षटकात ५ धावांवर पहिली विकेट गमावली. सलामीवीर झुबैद अकबरी ५ धावा करून बाद झाला. अफगाणिस्तानच्या डावाबद्दल बोलायचे झाले, तर शाहिदुल्ला कमालने सर्वाधिक नाबाद ४९ धावा केल्या. कर्णधार गुलबदिन नायब २७ धावा करून नाबाद राहिला. अफसर जझाईने १५ धावांचे योगदान दिले. या तिघांशिवाय इतर कोणत्याही फलंदाजाला दुहेरी आकडा गाठता आला नाही. जुबैद अकबरी पाच धावा करून बाद झाला, तर मोहम्मद शहजाद चार धावा करून बाद झाला. नूर अली झद्रान आणि करीम जनात यांनी प्रत्येकी एक धाव काढली. भारताकडून अर्शदीप सिंग, शिवम दुबे, शाहबाज नदीम आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

### भारतीय संघ संपूर्ण स्पर्धेत अपराजित

» ऋतुराज गायकवाडने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पावसामुळे सामना थांबवण्यात आला तेव्हा अफगाणिस्तानने १८.२ षटकात ५ गडी गमावून ११२ धावा केल्या होत्या. त्यानंतर हा सामना पूर्ण होऊ शकला नाही. अफगाणिस्तानसोबत खेळला जाणारा पुरुष क्रिकेटचा अंतिम सामना पावसामुळे रद्द करण्यात आला. या सामन्यात फक्त एक डाव पूर्ण करता आला होता ज्यात अफगाणिस्तानने 5 विकेट्सवर 112 धावा केल्या होत्या.

---

# रिझवानने मैदानावर अदा केली नमाज!

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

एकदिवसीय विश्वचषक 2023 मधील त्यांच्या पहिल्या सामन्यात पाकिस्तानने नेदरलँडचा 81 धावांनी पराभव केला. डच संघाकडून बास डी लीडेने 4 विकेट्ससह 67 धावा केल्या, पण तो आपल्या संघाला विजयापर्यंत नेऊ शकला नाही. या सामन्यात पाकिस्तानचा यष्टिरक्षक मोहम्मद रिझवानने मैदानावर नमाज अदा केली. वेगवान गोलंदाज हरिस रौफची नेदरलँड्सच्या पॉल व्हॅन मीकरनशी झाली टक्कर. मोहम्मद नवाज गोंधळात धावबाद झाला, तर बास डी लीडेने षटकार ठोकल्यानंतर रौफला डोळे मिचकावले. गोलंदाजी करताना नेदरलँड्चा वेगवान गोलंदाज पॉल व्हॅन मीकरन खेळपट्टीवर पडला. पहिल्या डावात मीकरनने 14व्या षटकातील चौथा चेंडू लेग स्टंपवर चांगल्या लांबीवर टाकला. मोहम्मद रिझवानने धाव घेण्यासाठी त्याला फाईन लेगकडे ढकलले, परंतु मीकरन फॉलोथ्रूमध्ये आपला तोल राखू शकला नाही आणि खेळपट्टीवर पडला. मात्र, काही वेळाने तो पुन्हा उभा राहिला आणि पूर्ण निर्धाराने आपल्या गोलंदाजीच्या दिशेने सरकला. पाकिस्तानचा मोहम्मद नवाज गोंधळातच धावबाद झाला. आर्यन दत्तने 47व्या षटकाचा दुसरा चेंडू फुल लेंथवर टाकला. शाहीन आफ्रिदीने रिव्हर्स स्वीप खेळला, पण चेंडू शॉर्ट फाईन लेग क्षेत्ररक्षकाकडे गेला. नॉन स्ट्रायकर एंडला उभ्या असलेल्या नवाजने धावायला सुरुवात केली.

# बांगलादेशचा अफगाणिस्तानवर विजय!

## » बांगलादेशने 34 षटकांत 4 गडी गमावून लक्ष्य गाठले

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**एकदिवसीय विश्वचषकाच्या तिसऱ्या सामन्यात बांगलादेशने अफगाणिस्तानचा ६ विकेट्सने पराभव केला. दोन्ही संघांमधील हा सामना धर्मशाला येथील हिमाचल प्रदेश क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर झाला. बांगलादेशचा कर्णधार शकीब अल हसनने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. अफगाणिस्तानचा संघ ३७.२ षटकात १५६ धावांवर सर्वबाद झाला. प्रत्युत्तरात बांगलादेशने ३४.४ षटकांत ४ गडी गमावत १५८ धावा करून सामना जिंकला.**




अफगाणिस्तानला सहा गडी राखून पराभूत करून विश्वचषक मोहिमेची सुरुवात केली. या विजयासह त्याचे एका सामन्यात दोन गुण झाले आहेत. ते पॉइंट टेबलमध्ये न्यूझीलंड आणि पाकिस्ताननंतर तिसऱ्या स्थानावर आहेत. तिन्ही संघांचे प्रत्येकी दोन गुण आहेत. उत्तम नेट रन रेटच्या आधारे न्यूझीलंड अव्वल स्थानी आहे. सामन्यात अर्धशतक झळकावण्याबरोबरच तीन विकेट्स घेणाऱ्या मेहदी हसनची सामनावीर म्हणून निवड करण्यात आली. बांगलादेशकडून नजमुल हुसेन शांतोने नाबाद ५९ धावा केल्या. त्याने ८३ चेंडूंच्या खेळीत तीन चौकार आणि एक षटकार लगावला. मेहदी हसन मिराजने ७३ चेंडूत ५७ धावांची खेळी केली. या दरम्याने त्याने पाच चौकार मारले. शाकिब अल हसन १४ धावा करून बाद झाला, तर लिटन दास १३ धावा करून बाद झाला. तनजीद हसनने पाच धावा केल्या. मुशफिकुर रहीम दोन धावा करून नाबाद राहिला. अफगाणिस्तानकडून फजलहक फारुकी, अजमतुल्ला उमरझाई आणि नवीन उल हक यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. तत्पूर्वी अफगाणिस्तानकडून रहमानउल्ला गुरबाजने सर्वाधिक ४७ धावा केल्या. इब्राहिम झद्रान आणि अजमतुल्ला ओमराई यांनी प्रत्येकी २२ धावांची खेळी केली. रहमत शाह आणि कर्णधार हशमतुल्ला शाहिदीने प्रत्येकी १८ धावांचे योगदान दिले. राशिद खानला ९, मोहम्मद नबी ६ आणि नजीबुल्ला जद्रानला केवळ पाच ५ करता आल्या. नवीन उल हक खातेही उघडू शकला नाही.